# जिल्हा परिषद नागपूर,अनुकंपा पदभरती सन २०२४ आक्षेपाचे अनुपालन यादी

| अ.क्र. | आक्षेप घेणा-यांचे नाव | आक्षेपाचे संक्षिप्त विवरण | आक्षेपाचे अनुपालन |
|---|---|---|---|
| १. | श्री.अभिजीत सुधाकर कामळे<br>दिनांक १९.१२.२०२४ | संभाव्य निवड यादीमध्ये माझे नाव अ.क्र.१ वर ग्रामसेवक या पदाकरिता दर्शविण्यात आलेले आहे.परंतु,ग्रामसेवक या पदाकरिता इच्छुक नसल्यामुळे आपणास नम्र विनंती आहे की,मला अनुकंपा तत्वावर वरिष्ठ सहाय्यक(लेखा),वरिष्ठ सहाय्यक(लि),आरोग्य सेवक किंवा परिचर या पदापैकी कोणत्याही पदावर नियुक्ती देण्यात यावी. | श्री.अभिजीत सुधाकर कामळे यांचा दिनांक १९.१२.२०२४ च्या विनंती अर्जानुसार त्यांचे जेष्ठता क्रम शैक्षणिक अर्हता व उपलब्ध असलेल्या पदानुसार वरिष्ठ सहाय्यक(लिपिक),पदावर नियुक्ती देण्यात येत आहे . |
| २. | कु.प्रतिक्षा प्रकाश लाडेकर<br>दिनांक १९.१२.२०२४ | सविनय अर्ज सादर करते की,माझे वडिल श्री.प्रकाश लाडेकर दिनांक ०७/०५/२०२१ रोजी स्वर्गवासी झाले त्याअनुषंगाने अनुकंपा तत्वावर मी कु.प्रतिक्षा लाडेकर माझी नियुक्ती स्थानिक पातळीवर नागपूर मध्ये करण्यात यावी हि विनंती.<br>माझी आजी दिर्घ आजारी असून माझ्या आईची तब्येत बरी नसते त्यामुळे त्यांची काळजी घेण्यासाठी मला आजीच्या सेवेकरिता नागपूर येथे नियुक्ती देण्यात यावी ही विनंती. | दिनांक १७.१२.२०२४ ला संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेल्या संभाव्य निवड यादीमध्ये कु.प्रतिक्षा प्रकाश लाडेकर यांचा जेष्ठता क्र.२८असुन सामान्य प्रशासन विभागाचे शासननिर्णय दिनांक २१.०९.२०१७ मधील मुददा क्र.१६ च्या अटी व शर्ती चे अधिन राहून परिचर या पदावर विचारक्षेत्रात ठेवण्यात आले आहे.<br>कु.प्रतिक्षा प्रकाश लाडेकर यांची निवड यादीमध्ये वरिलप्रमाणे परिचर या पदाकरिता करण्यात आलेली आहे. अंतिम निवड यादीमध्ये निवड झाल्यानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास त्यांचे अर्जाचा विचार करून नागपूर येथे पदस्थापनेचा विचार करण्यात येईल. |
| ३. | कु.अनुष्का अनिल पाटील<br>दिनांक १९.१२.२०२४ | सविनय विनंतीपुर्वक अर्ज सादर करते की,जिल्हा परिषद नागपूर च्या अनुकंपा पदभरतीच्या संभाव्य निवड यादी सन २०२४ मध्ये कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरिता माझी निवड झालेली आहे.<br>त्याअनुषंगाने,सविनय विनंती करते की,सदयस्थितीत माझे इंजिनियरिंगचे शेवटचे वर्ष सुरू असून माझे शिक्षण सुरू आहे.करिता,मला शिक्षण संपेपर्यंत सदर पदावर रुजू होण्याची मुदतवाढ देण्याची कृपा करावी ही विनंती. | कु.अनुष्का अनिल पाटील यांनी दिनांक १९.१२.२०२४ रोजीचे अर्जान्वये Engineering चे अंतिम वर्षाचे शिक्षण पुर्ण करणेकरिता मुदतवाढ मिळणेकरिता कार्यालया मध्ये अर्ज सादर केलेला आहे.<br>वरिलप्रमाणे मुदतवाढ मिळणेकरिता कार्यालयामध्ये सादर करण्यात आलेल्या अर्जानुसार त्यांच्या Engineering चे अंतिम वर्षाचे शिक्षण पुर्ण करणेकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे. |
| ४. | कु.वेदांती सुनिल शेंडे<br>दिनांक १९.१२.२०२४ | वरिल विषयी अनुसरून मी वेदांती सुनिल शेंडे आपणास विनंती करण्यात येते की,दिनांक १७.१२.२०२४ रोजी अनुकंपा पदभरती संभाव्य निवड यादी सन २०२४ मधील माझे नाव अनुकंपा क्र.३० वर आहे. माझ्या नावासमोर विचाराधीन असलेले पद परिचर आहे.<br>माझी शैक्षणिक अर्हता HSC-94%, MSCIT,आणि B.Tech Civil Engineering 2nd year अशी असून माझ्या शैक्षणिक अर्हता नुसार मला पदावर नियुक्त करा. | दिनांक १७.१२.२०२४ ला संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेल्या संभाव्य निवड यादीमध्ये कु.वेदांती सुनिल शेंडे यांचा जेष्ठता क्र.३० असुन यांची निवड सामान्य प्रशासन विभागाचे शासननिर्णय दिनांक २१.०९.२०१७ मधील मुददा क्र.१६च्या अटी व शर्तीचे अधिन राहून परिचर या पदावर विचारक्षेत्रात ठेवण्यात आलेले आहे.<br>तथापि,कु.वेदांती सुनिल शेंडे यांची शैक्षणिक अर्हता HSC 94%,MSCIT,आणि B.Tech Civil Engineering2nd year अशी असून शैक्षणिक अर्हता नुसार गट क च्या पदावर नियुक्ती देण्यात यावी असे त्यांचे अर्जामध्ये नमुद आहे.<br>कु.वेदांती सुनिल शेंडे यांनी कार्यालयात सादर केलेले MSCIT प्रमाणपत्र दिनांक १९.१२.२०२४ रोजी सादर केले असल्याने त्यांचे MSCIT प्रमाणपत्राची नोंद घेता येणार नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | परंतु,इयत्ता १२ वी मध्ये Computer Science विषय असल्याने माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि)विभाग शासननिर्णय दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ अन्वये कु.वेदांती सुनिल शेंडे यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार "कंत्राटी ग्रामसेवक" या पदाकरिता निवड करण्यात येत आहे. |
| ५. | कु.शुभांगी दिलीप मोहने<br>दिनांक २०.१२.२०२४ | वरिल विषयी अनुसरून मी कु.शुभांगी दिलीप मोहने आपणास विनंती करते की,दिनांक १७.१२.२०२४ रोजी अनुकंपा पदभरती संभाव्य निवड यादी सन २०२४ मधील माझे नाव अनुकंपा क्र.१९ वर आहे.माझ्या नावासमोर विचाराधीन असलेले पद परिचर आहे.<br>माझी शैक्षणिक अर्हता विदयुत अभियांत्रिकी (B.E Electrical) अशी असून माझ्या शैक्षणिक अर्हता नुसार मला योग्य पदावर नियुक्त करावे ही विनंती. | अनुकंपा तत्वावर नियुक्ती बाबतची सन २०२४ ची सेवाजेष्ठता यादी मधील रिक्त असलेल्या पदावर संबंधित उमेद्वाराला शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता रिक्त असलेल्या पदाकरिता धारण करित असल्यामुळे नेमणुकीस पात्र ठरविण्यात आलेले आहे.<br>कु.शुभांगी दिलीप मोहने यांचे क्रमांकापर्यंत कंत्राटी ग्रामसेवक हे पद रिक्त असून त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार पात्र ठरविण्यात आले असून त्यांनी त्यांची शैक्षणिक अर्हता विदयुत अभियांत्रिकी (B.E-Electrical) अशी असून त्यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार पद उपलब्ध नसल्याने त्यांची विनंती मान्य करता येणार नाही. |
| ६. | कु.साक्षी हेमंत मोहोड<br>दिनांक २०.१२.२०२४ | सविनय पुर्वक अर्ज सादर करते की,जिल्हा परिषद नागपूर कार्यालयात दिनांक १८.१२.२०२४ ला अनुकंपा तत्वावर यादी मध्ये माझा अ.क्र.५१ असुन माझ्या नावासमोर कंत्राटी पध्दतीवर ग्रामसेवक पदाचा उल्लेख केलेला आहे.<br>जिल्हा परिषद मध्ये धोरणात्मक निर्णयानुसार पदवीधर सिव्हील इंजिनियर यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी दिलेली आहे. मी बी.टेक(बायोटेक,बिझनेस मॅनेजमेंट पदवीधर असुन MSCIT,English Typing उतीर्ण असून मला शैक्षणिक पात्रतेनुसार समकक्ष असलेल्या पदावर नोकरी मिळणे हवी होती.परंतु,मला अनुकंपा तत्वावर कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरिता निवड झालेली आहे असे प्रकाशित केलेल्या यादीवरून दिसते.हा एक प्रकारचा माझ्यावर झालेला अन्याय आहे.<br>माझ्या शैक्षणिक पदवी पात्रतेचा आपण आवर्जून विचार करून मला योग्य पदावर आपल्या कार्यकारी क्षेत्रात सेवा करण्याची संधी दयाल हि नम्र विनंती मला शैक्षणिक पात्रतेनुसार नेमणुक मिळेपर्यंत मी अजुन काही काळापर्यंत वाट पाहण्यासाठी तयार आहे.या अगोदर मला माझ्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे मला नोकरी मिळण्यासाठी दिनांक ११.१०.२०२४ ला आपल्या कार्यालयात अर्ज केलेला होता. | अनुकंपा तत्वावर नियुक्ती बाबतची सन २०२४ च्या अंतिम प्रतिक्षासुची यादीमधील जेष्ठतेनुसार रिक्त असलेल्या पदावर संबंधित उमेद्वाराला त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व रिक्त असलेल्या पदाकरिता धारण करित असल्यामुळे नेमणुकीस पात्र ठरविण्यात आलेले आहे.<br>कु.साक्षी हेमंत मोहोड यांचे क्रमांकापर्यंत कंत्राटी ग्रामसेवक हे पद रिक्त असून त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार पात्र ठरविण्यात आले असून त्यांनी त्यांची शैक्षणिक अर्हता बी.टेक (बायोटेक,बिझनेस मॅनेजमेंट पदवीधर) MSCIT, English-Typing अशी असून त्यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती देण्याबाबत विनंती केलेली आहे.<br>परंतु,त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार पद उपलब्ध नसल्याने त्यांची विनंती मान्य करता येणार नाही. |
| ७. | **कु.सलोनी मनोज जयस्वाल**<br>दिनांक २०.१२.२०२४ | वरिल विषयी अनुसरून मी कु.सलोनी मनोज जयस्वाल आपणास विनंती करण्यात येते की,दिनांक१७.१२.२०२४ रोजी अनुकंपा पदभरती संभाव्य निवड यादी सन २०२४ मधील माझे नाव अनुकंपा क्र.४६ वर आहे.माझ्या नावासमोर विचाराधीन असलेले पद परिचर आहे.<br>माझी शैक्षणिक अर्हता D.Pharm अशी असून माझ्या शैक्षणिक अर्हतानुसार मला"औषधनिर्माणअधिकारी"(Pharmacist)पदावर नियुक्त करावे ही विनंती. | कु.सलोनी मनोज जयस्वाल यांचा जेष्ठता क्र.४६ असुन यांना शासननिर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१.०९.२०१७ मधील मुददा क्र.१६ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून परिचर या पदावर विचारक्षेत्रात ठेवण्यात आलेले आहे.<br>कु.सलोनी मनोज जयस्वाल विनंती अर्जानुसार शैक्षणिक अर्हता D.Pharm अशी असून शैक्षणिक अर्हतानुसार सामान्य प्रशासन विभागाचे शासननिर्णय दिनांक २१.०९.२०१७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मधील मुददा क्र.१६ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून त्यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार "औषध निर्माण अधिकारी"पद रिक्त असल्यास अथवा उपलब्ध असलेल्या गट-क च्या अन्य पदावर त्यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार प्राधान्याने नियुक्ती देण्यात येईल. |
| ८. | **श्रीमती कविता शरदराव रुद्रकार**<br>दिनांक २३.१२.२०२४ | आपणास सविनय विनंती पुर्वक अर्ज सादर करते की,दिनांक १७.१२.२०२४ ला माझी परिचर म्हणून नियुक्ती करण्यात आली असुन माझी MSCIT तसेच मराठी टायपिंग कोर्स पुर्ण झाला आहे.<br>तरी,आज मला चतुर्थ श्रेणीवर सेवेत न घेता माझे शिक्षणाचा विचार करून मला आपण आपल्या कार्यालयाअंतर्गत वरिष्ठ या पदावर सेवेत सामावून घ्यावे.माझ्या शिक्षणाच्या कागदपत्रावरून यादीमध्ये नोंद घेण्यात यावी हि विनंती. | दिनांक १७.१२.२०२४ ला संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेल्या संभाव्य निवड यादीमध्ये श्रीमती कविता **शरदराव रुद्रकार** यांचा जेष्ठता क्र.५२ असुन यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासननिर्णय दिनांक २१.०९.२०१७ मधील मुददा क्र.१६ अटी व शर्तीच्या अधिन राहून परिचर या पदावर विचारक्षेत्रात ठेवण्यात आलेले आहे.<br>श्रीमती कविता **शरदराव रुद्रकार** यांनी त्यांचे मराठी टंकलेखन परिक्षा उतीर्ण प्रमाणपत्र कार्यालयास सादर केले आहे परंतु,त्यांनी कार्यालयात सादर केलेले मराठी टंकलेखन परिक्षा उतीर्ण प्रमाणपत्र हे सामान्य प्रशासन विभागाचे शासनपुरक पत्र दिनांक १६ जुलै २०१८ मधील महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद (MSCE) पुणे मार्फत घेण्यात येणा-या गव्हरमेंट सर्टिफिकेट इन कॉम्पुटर टायपिंग बेसिक कोर्स (GCC-TBC) चे प्रमाणपत्र नसल्याने त्यांचे मराठी टंकलेखन परिक्षा प्रमाणपत्र वैध ठरत नाही.<br>तथापि,श्रीमती कविता शरद रुद्रकार यांनी कार्यालयात सादर केलेले MSCIT प्रमाणपत्र दिनांक २३.१२.२०२४ रोजी सादर केले असल्याने त्यांच्या MSCIT प्रमाणपत्राची नोंद घेता येणार नाही. |
| ९. | **श्री.मोहन राजेंद्र मोंढे**<br>दिनांक २४.१२.२०२४ | आपणास सविनय अर्ज सेवेशी सादर करतो की,आपल्या कार्यालयामार्फत नुकतीच अनुकंपा तत्वावर पदभरती संभाव्य यादी सन २०२४ प्रकाशीत झालेली आहे.त्या यादीत मला जेष्ठता अ.क्र. ३८ वर कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरिता नियुक्ती दिलेली आहे.<br>माझी शैक्षणिक पात्रता B.E Computer Engineering ही आहे.करिता कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरिता झालेली निवड मला मान्य नाही.<br>करिता,माझ्या B.E Computer Engineering या शैक्षणिक पात्रतेनुसार अनुकंपा तत्वावर पद देण्यात यावे ही विनंती. | अनुकंपा तत्वावर नियुक्ती बाबतची सन २०२४ च्या जेष्ठता यादी मधील गट क च्या उपलब्ध् असलेल्या पदावर संबंधित उमेद्वार यांना त्यांचे जेष्ठतेनुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता रिक्त असलेल्या पदाकरिता धारण करित असल्यामुळे नेमणुकीस पात्र ठरविण्यात आलेले आहे.<br>**श्री.मोहन राजेंद्र मोंढे** यांचे जेष्ठता क्रमांकापर्यंत कंत्राटी ग्रामसेवक हे पद रिक्त असून त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार पात्र ठरविण्यात आले असून त्यांनी त्यांची शैक्षणिक अर्हता (B.E Computer Engineering) अशी असून त्याचे शैक्षणिक अर्हतेनुसार पद उपलब्ध नसल्याने त्यांची विनंती मान्य करता येणार नाही. |

दिनांक:- ०७/०१/२०२५ / ४६/२०२५

**(विपुल जाधव)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
**जिल्हा परिषद,नागपूर**

**(विनायक महामुनी,**भा.प्र.से.**)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नागपूर**